# अमृतसरमध्ये माझी उमेदवारी

**अरुण जेटली**
विरोधी पक्षनेते(राज्यसभा)

अमृतसर संसदीय लोकसभा मतविस्तारात निवडणुक लढविण्यासाठी उमेदवार म्हणून माझे नाव जाहिर करण्यात आल्याबद्दल मी भाजपाचे अत्यंत आभारी आहे.

मी 1970 मध्ये खुपच लहान असल्यापासून राजकीय कार्यकर्ता बनलो. त्यावेळी मी अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेसोबत जोडलो गेलो होतो. मी माझ्या कॉलेजची आणि नंतर दिल्ली युनिवर्सीटीत यशस्वीपणे निवडणुक लढली. भ्रष्टाचार आणि आणीबाणीच्या परिस्थितीविरोधात जेपी आंदोलन माझ्या जीवनातील आठवणीचे क्षण आहेत. मी आणीबाणीच्या परिस्थितीत सत्याग्रह केला होता आणि मला अटक झाल्यामुळे एकोणीम महिने जेलमध्ये राहावे लागले होते. त्या कालावधी दरम्यान जे काही घडले त्यामुळे माझी विचारधारा मजबूत झाली.

1980 मध्ये भाजपची रचना झाली त्या पहिल्या दिवसापासूनच मी भाजपाचा सदस्य बनलो. माझा संबंध अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेतून भाजपकडे गेला. मला पूर्ण वेळ राजकीय कार्यकर्ता बनण्याची इच्छा होती. 1977 मध्ये मी वकील म्हणून प्रॅक्टीस सुरु केली होती आणि 1990 पासून मला सीनीयर एडवोकेट म्हणून नियुक्त करण्यात आले. माझी व्यावसायिक कामगीरी विकसत गेली तस तशी मी भाजपामध्ये अधिकाधिक सक्रीय झालो.

मी पक्षात कार्यकर्ता आणि वकील बनून राहील असे मानत होतो, परंतु मी पूर्ण वेळ राजकारणी बनेल अशी कल्पना देखील मी केली नव्हती. 1980 मध्ये मी भाजपच्या राजकीय अभियानाच्या मॅनेजमेंट टीम मध्ये शामिल झालो. मी त्यामध्ये राष्ट्रीय कार्यकारिणीचे सदस्य आणि राष्ट्रीय प्रवक्ता होतो. 1999 मध्ये मी मंत्री म्हणून एनडीए सरकारमध्ये यावे म्हणून माझे नेते श्री अटलबिहारी वाजपेयी आणि श्री लालकृष्ण आडवाणी यांच्या द्वारे विनंती करण्यात आली. त्या वेळी मी खासदार सुद्धा नव्हतो. मी सरकारमध्ये जोडलो गेलो आणि नियमानुसार सहा महिन्याच्या आत गुजरातच्या जागेवरुन राज्यसभेतील खासदार बनलो. तेव्हापासून मी संसदेत आहे. एक मंत्री म्हणून, पक्षाचे महामंत्री म्हणून अथवा राज्यसभेत विरोधी पक्षनेते म्हणून मी नेहमी पक्षाचे प्रतिनिधित्व केले आहे. मला निवडणुक आयोजनाची कामगीरी देण्यात येत होती पण मला कधीच लोकसभेची निवडणुक मिळविण्याची संधी मिळाली नव्हती.

पक्षाने यावेळी मला अमृतसर मधून तिकीट दिली. मला अमृतसर शहराबद्दल खुप प्रेम आहे आणि त्या शहरामधूनच मला उमेदवारी देण्यात आली आहे. अमृतसर भारतातील यात्राधाम मधील सर्वात महत्त्वपूर्ण केंद्र आहे. हे शहर स्वतःची आगळी-वेगळी संस्कृती असलेले शहर आहे. ते उत्तर भारतातील व्यापारी केंद्र आहे. लहानपणापासून अमृतसरमध्ये माझी ये-जा राहिली आहे कारण की त्या शहरासोबत माझे व्यक्तीगत ऋणानुबंध आहेत. माझी आई अमृतसरमधील आहे. त्यांचा जन्म आणि त्या तिथेच वाढल्या आहेत. माझ्या बहिणीचा जन्म देखील तिथेच झाला. माझी पत्नी मूळ जम्मू-काश्मीरची आहे पण तिचा जन्म अमृतसरमध्ये झाला आहे कारण त्या शहरात आरोग्याच्या दृष्टीने खुप सुविधा आहेत. अमृतसरमध्ये माझे आजोळ असल्याकारणाने लहानपणापासूनच माझे त्या शहरात खुप येणे-जाणे आहे. मी सर्व महत्त्वपूर्ण राजकीय कार्यक्रमासाठी अमृतसरमध्ये नियमितपणे सहभागी होतो. उत्कृष्ट रुचीच्या खाण्या-पिण्याची सोय असल्याने माझे तिथे घनिष्ट नाते आहे. अमृतसरमध्ये तुमच्या मनपसंत भोजन मिळणे हे सर्वात आनंददायी आहे. अमृतसरमध्ये राहणारे माझे मित्र, पक्षाचे सदस्य आणि माझ्या नातेवाईकांकडून शुभेच्छांचा वर्षाव होत आहे. मी त्या शहरात खुप वर्षे राहण्याचा विचार करित आहे.

मला निवडणुक लढण्यासाठी मानसिक रित्या तयार करणे आणि मदत करणे यासाठी माझे मित्र नवज्योत सिंग सिद्धू यांचे आभार व्यक्त करायलाच पाहिजे. नवज्योत आणि माझे संबंध राजकीय पेक्षा व्यक्तिगत अधिक आहेत. मी त्यांच्यासारखा दुसरा कोणता मित्र असू शकेल अशी कल्पना सुद्धा करु शकत नाही. काही दिवसांपूर्वीच त्यांनी मला निवडणुक लढविण्यासाठी अमृतसर निवड असा आग्रह केला होता. मी अमृतसर अथवा कुरुक्षेत्र कीं पश्चिम दिल्ली सह अन्य कोणत्या मतविस्तारातून निवडणुक लढविण्यासाठी विचार करित होतो. पक्षाच्या अध्यक्षांनी तो विचार साकारला. त्यांनी स्पष्ट केले की मी स्वतः कोणताही व्यक्तीगत किंवा राजकारणी फायदा मिळविण्यासाठी आग्रह करत नाही. त्यांच्या विषयीचा आदर आणि गौरव राजकारणात आमच्यासारख्या सर्वांसाठी एक बोध आहे. सिद्धू क्रिकेट मध्ये एक चांगले बॅटसमन होते. या वेळी त्यांनी मला बोल्ड केले आहे.